**ठळक बातम्या**

- भारताचा सागरी दृष्टिकोन हा सुरक्षितता, स्थैर्य आणि आत्मनिर्भरतेवर आधारित असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन, मुंबईत इंडिया मेरिटाईम वीक परिषदेचं उद्घाटन

- दुसऱ्या टप्प्यात बारा राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधे मतदार याद्यांचं सखोल पुनरीक्षण करण्याची निवडणूक आयोगाची घोषणा

- जगानं दहशतवादाप्रती शून्य सहिष्णुता धोरण अवलंबवायला हवं अशी भारताची २० व्या पूर्व आशिया शिखर परिषदेत भूमिका

- सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्याकडून पुढचे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती सूर्य कांत यांच्या नावाची शिफारस

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ५६७ अंकांची वाढ

<><><><><>

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी आज मुंबईत इंडिया मेरिटाईम वीकचं उद्घाटन केलं, तसंच माझगाव गोदीत खोल समुद्रात जाऊन मासेमारी करू शकणाऱ्या दोन नौकांचं लोकार्पणही त्यांच्या हस्ते झालं. याविषयी अधिक जाणून घेऊ या आमच्या प्रतिनिधीकडून....

***होल्ड... व्हीसी-***

*(भारताचा सागरी दृष्टिकोन हा सुरक्षा, स्थैर्य आणि आत्मनिर्भरता या तीन तत्त्वांवर आधारलेला असून गेल्या काही वर्षांतल्या सर्वसमावेशक सुधारणांमुळे भारत सागरी क्षेत्रातला एक महत्त्वाचा देश म्हणून उभा राहात आहे, असं प्रतिपादन अमित शहा यांनी आज इंडिया मेरीटाईम वीकच्या उद्घाटनप्रसंगी केलं. या कार्यक्रमात ८५ देशांचा सहभाग असल्याची माहिती केंद्रीय बंदरं, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी दिली. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनीही आज इंडिया मेरीटाईम वीकला संबोधित केलं. या पाच दिवसीय कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी राज्याच्या*

*बंदर विभागानं सागरी व्यापार क्षेत्रात ५६ हजार कोटी रुपयांचे १५ सामंजस्य करार केल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी वार्ताहरांशी बोलताना दिली. यात दिघी आणि जयगड बंदरांचा विकास आणि विस्तार, नवीन जहाजबांधणी प्रकल्प उभारणं, स्वच्छ ऊर्जेवर चालणाऱ्या जहाजांची बांधणी, जलवाहतूक इत्यादी क्षेत्रातल्या सामंजस्य करारांचा समावेश असल्याचं त्यांनी सांगितलं.*

*केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते माझगाव गोदी इथं खोल समुद्रात जाऊन मासेमारी करायची क्षमता असलेल्या दोन नौकांचं लोकार्पणही झालं. यावेळी ते म्हणाले,*

***होल्ड... बाईट- अमित शहा***

*अशा आणखी १२ बोटी मासेमार सहकारी सोसायट्यांना लवकरच देणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली. आकाशवाणी बातम्यांसाठी, मुंबईहून, अंकिता आपटे.)*

**<><><><><>**

मतदार याद्यांचं सखोल पुनरीक्षण बारा राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधे केलं जाणार असल्याचं निवडणूक आयोगानं आज जाहीर केलं. मतदारयाद्या अधिक पारदर्शक आणि निर्दोष करणं हे या पुनरीक्षणाचं उद्दिष्ट आहे, असं मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत सांगितलं. दुसऱ्या टप्प्यात सखोल पुनरीक्षण टप्प्याटप्प्यानं राबवलं जाईल, असं ते म्हणाले. एकही मतदार या यादीतून वगळला जाऊ नये आणि चुकीची व्यक्ती यादीत समाविष्ट होऊ नये ही मतदार नोंदणी अधिकाऱ्याची जबाबदारी असल्याचं ज्ञानेश कुमार यांनी सांगितलं....

**- - होल्ड - बाईट ज्ञानेश कुमार - -**

**<><><><><>**

जागतिक स्थैर्य आणि शांततेला सर्वात जास्त धोका दहशतवादापासून आहे, त्यामुळे जगानं दहशतवादाप्रती शून्य सहिष्णुता धोरण अवलंबवायला हवं असं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी म्हटलं आहे. मलेशियातील क्वालालंपूर इथं २०व्या पूर्व आशिया शिखर परिषदेला ते आज संबोधित करत होते. दहशतवादाशी अजिबात तडजोड केली जाणार नाही असं सांगत जयशंकर यांनी जगातल्या सर्व देशांना दहशतवादाविरोधात मोहिम राबवण्याचं आवाहन केलं.

शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर जयशंकर यांनी आज न्यूझिलंडचे प्रधानमंत्री क्रिस्तोफर लक्सन यांची भेट घेतली. भारत-न्यूझिलंड द्विपक्षीय सहकार्य वाढवण्याबाबतच्या लक्सन यांच्या वचनबद्धतेचं त्यांनी कौतुक केलं आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वतीनं त्यांना शुभेच्छा दिल्या.

<><><><>

भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी पुढचे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या नावाची शिफारस केली आहे. सरन्यायाधीश गवई येत्या २३ नोव्हेंबर रोजी सेवानिवृत्त होत असून त्यानंतर न्यायमूर्ती सूर्यकांत हे सरन्यायाधीशपदाची सूत्रं स्वीकारतील. या शिफारशीनंतर केंद्र सरकार त्यांच्या नावाची अधिसूचना जारी करेल. त्यानंतर न्यायमूर्ती सूर्यकांत २४ नोव्हेंबर रोजी सरन्यायाधीशपदाची शपथ घेतील. त्यांना १४ महिन्यांचा कालावधी मिळणार असून ते ९ फेब्रुवारी २०२७ रोजी सेवानिवृत्त होतील.

<><><><>

भारतीय शेअर बाजारात वाढीचं सत्र आज पुन्हा सुरु झालं. दिवसअखेर मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ५६७ अंकांची वाढ झाली आणि तो ८४ हजार ७७९ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १७१ अंकांची वाढ नोंदवत २५ हजार ९६६ अंकांवर बंद झाला.

<><><><>

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा निर्धार मेळावा आज मुंबईत झाला. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी या मेळाव्याला संबोधित केलं. मुंबई महापालिका जिंकण्याचा निर्धार ठाकरे यांनी यावेळी व्यक्त केला. भाजपा हा स्वयंघोषित देशप्रेमी गट असून आत्मनिर्भर भारताची निर्मिती करू इच्छिणाऱ्या या पक्षाला मतचोरी करावी लागत आहे, अशी टीका त्यांनी केली. समाजात तणाव निर्माण करून मत मिळवणं हे भाजपाचं धोरण आहे, असं ते म्हणाले. भाजपाच्या जीएसटी धोरणावर त्यांनी जोरदार टीका केली.

<><><><>

मुंबई महानगर पालिकेच्या निवडणुकीत महायुतीची एकजूट भक्कम राहिल, असं केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले म्हणाले. ते आज नागपूर इथं बोलत होते.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमुळे महाविकास आघाडीत फूट पडली असून त्यामुळे मतं विभागली जातील, अशी शक्यताही आठवले यांनी व्यक्त केली आहे.

<><><><><>

भारताची संरक्षण निर्यात आता २३ हजार ५०० कोटी रुपयांच्या विक्रमी स्तरावर पोहोचल्याची माहिती संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी दिली आहे. नवी दिल्ली इथं झालेल्या एसआयडीएम वार्षिक परिषदेला ते आज संबोधित करत होते. गेल्या दशकात देशांतर्गत संरक्षण उत्पादन १ लाख ५० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त वाढलं  आहे, असं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

अर्जेंटिनात झालेल्या मध्यावधी निवडणुकीत अध्यक्ष जेविअर मिलेई यांच्या नेतृत्वाखालच्या ला लिब्रेटाड एवेंजा पक्षानं निर्णायक बहुमत मिळवलं आहे. त्यांच्या पक्षाला ४१ टक्के मत मिळाली असून त्यांनी कायदेमंडळातल्या २४ पैकी १३, तर कनिष्ठ सभागृहातल्या १२७ पैकी ६४ जागा जिंकल्या आहेत. अर्जेंटिनाच्या नागरिकांना पराभूत मानसिकता मान्य नाही हे या निकालातून स्पष्ट झाल्याचं त्यांनी निकालानंतर म्हटलं आहे.

<><><><><>

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांची  आज जर्मनीचे संघीय परराष्ट्र मंत्री जॉन वेडफूल ययांच्यासोबत बैठक झाली. यावेळी दोन्ही देशांच्या हिताच्या मुद्द्यांसह विकासाबाबत चर्चा झाल्याचं गोयल यांनी समाजमाध्यमवरच्या एका संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

इस्रो, अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं एलव्हीएम-३ हे प्रक्षेपक वाहन श्रीहरीकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रातल्या लॉंच पॅडवर पोहचवलं आहे. या प्रक्षेपक वाहनाची जुळवणी पूर्ण झाली असून ते २ नोव्हेंबरला अवकाशात प्रक्षेपित केल्या जाणाऱ्या CMS 03 या दूरसंचार उपग्रहाशी जोडलेले आहे. हा उपग्रह भारताच्या महासागर क्षेत्रात संवाद वाढवेल आणि दुर्गम भागात डिजिटल सेवा उपलब्ध करून देईल.

<><><><><>

अयोध्येमधल्या श्री राम जन्मभूमी मंदिराचं उर्वरित बांधकाम पूर्ण झाल्याचं श्रीराम जन्मभूमी तिर्थक्षेत्र ट्रस्टनं जाहीर केलं आहे. या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २५ नोव्हेंबर रोजी मंदिरावर झेंडा फडकावला जाईल.

//<><><><><>//